# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या जडणघडणीत योगदान

**प्रा.डॉ.डोंगरे एल.बी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड (महाराष्ट्र).

भारतरत्न घटनाकार राष्ट्रनिर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या जडणघडणीत अजोड योगदान आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान शिक्षण स्त्री, जल, कृषी, विज, राष्ट्रीय एकात्मता या क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे.

शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे आणि जो प्राशन करिल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही. डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण प्रचार व प्रसारावर अधिक भर दिला. कारण शिक्षणामुळेच विकसित भारत देशाचे स्वप्न सत्यामध्ये अवतरु शकते, असा त्यांचा विश्वास होता. देशाच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकिय, सांस्कृतिक, शैक्षणिक, मानवतावाद, राष्ट्रीय एकात्मता या बाबत क्रांतीकारी बदल घडवून आणण्याचे महान कार्य डॉ.आंबेडकरांनी केलेले आहे.

विकसित अखंड भारतासाठी त्यांनी मांडलेले विचार व संपूर्ण आयुष्यभर त्यासाठी त्यांनी केलेले संघर्षात्मक कार्य कोणालाही नाकारता येणार नाही. विकसित भारताचे स्वप्न त्यांच्या उतुंग व्यक्तिमत्त्वाची ओळख आहे.

देशांतर्गत विषय आर्थिक परिस्थीती, संसदीय लोकशाही, भाषावार प्रांतरचना, शैक्षणिक स्थिती, राज्य समाजवाद विद्यापिठांची पूनर्रचना, कृषी क्षेत्राची संपन्नता, पर्यावरणासाठी पाणी व वृक्ष लागवडीचे महत्त्व, औद्योगीक क्षेत्राच्या विकासाकरीता व्यापक प्रमाणात विद्युत निर्मीती महिलांचे स्वातंत्र्य व सबलीकरण, अस्पृश्यता निमुर्लन, सर्वधर्म समभाव, अनिष्ठ रुढी प्रथाचे उच्चाटन, सामाजिक न्यायावर आधारीत, मानवतावाद समानतेचे, समर्थन, आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य, राष्ट्राच्या प्रतिष्ठेत वाढ करणे, देशातील बेरोजगारी, विषमता मुक्ती, व्यसन मुक्ती, अस्पृश्यता मुक्ती, हे डॉ. आंबेडकरांच्या स्वप्नातील भारताचे रुप आहे.

प्रस्तुत शोध निबंधात डॉ.आंबेडकर यांच्या विकसित भारत देशाच्या विचार व कृतिवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्यामध्ये देशाच्या विविधतेवर लोकशाही, विषमतेवर, आर्थिक स्थितीवर, स्त्री कृषी शोषन मुक्त धोरणावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दीष्ट्ये :**

१) डॉ. आंबेडकर यांनी भारत देशाच्या स्वावलंबन तत्त्वांचा, विचारांचा अभ्यास करणे.

२) डॉ. आंबेडकर यांनी भारतीय राष्ट्रीय एकात्मतेच्या विकासातील योगदानाचे अध्ययन करणे.

३) कृषी, विज, जल शिक्षण, अर्थव्यवस्था या क्षेत्रात अजोड योगदान आहे.

**गृहितकृत्य :-**

१) डॉ.आंबेडकरांचे विचार समतेवर आधारित विकसित भारताचे होते.

२) भारत देशाच्या विकासात डॉ.आंबेडकरांचे महत्त्वाचे योगदान आहे.

३) कृषी संपन्नता, स्त्रीदास्यतेचा विरोध, करून नवीन स्वतंत्र भारताच्या संस्कृतीचा उदय झाला.

**संशोधन पद्धती :-**

डॉ. आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत या विषयाचे अध्ययन करण्यासाठी दुय्यम तथ्य साम्रुग्रीचा अवलंब करण्यात आलेला असून आशय विश्लेषण करण्यात आले आहे. त्याकरिता संबधीत विषयाचे ग्रंथ, शोध निबंध, पुस्तके, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**विभाजनास विरोध :-**

डॉ.बी.आर. आंबेडकर संविधान सभेत पाकीस्तान निर्मीती बदल बोलताना म्हणतात की, महोदय, या महान देशाच्या भावी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संरचनांना अंतिम आकार देणाऱ्या भावी उत्क्रांती विषयी माझ्या मनात किंचीतही शंका नाही.

मी हे जाणतो की, आज आपण राजकिय, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या विभाजीत आहोत, आपण युद्धात प्रतिस्पर्धी गटात विभाजीत आहोत आणि मी कदाचित असे हि म्हणेन कि, मी ही अशाच एका प्रतिस्पर्धी गटाचा नेता आहे. परंतु महोदय, हे सर्व असूनही जर समय आणि परिस्थिती अनुकूल झाली तर या जगातील कोणतीही शक्ती या देशाला एकात्म होण्यापासून प्रतिबंधीत करून टकरनार नाही, अशी माझी पक्की धारणा आहे. आपल्या सर्व जाती, पंथासहित आपण या नात्याच्या स्वरुपात एकसंघ लोक आहोत, या विषयी माझ्या मनात किंचीतही शंका नाही. भारताच्या फाळणी करिता मुस्लीम लींगने आंदोलन उभारले आहे म्हणतांना मला कोणताही संकोच वाटत नाही. असे असले तरी एक दिवस असा येईल कि त्यांना प्रकाशाचे दर्शन होईल. त्यांना याची जाणीव होईल आणि ते असा विचार करतील की एकात्म अखंड भारत हा त्यांच्या करिता ही अधिक योग्य आहे. या विधानाच्या प्रत्येय आज आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील भारत देशाच्या वाढत असलेलया प्रतिष्ठेत दिसून येतो तर पाकिस्तान सारख्या राष्ट्रनिर्मीतीचे कार्य किती चुकीचे होते. हे त्यांच्या देशाच्या कर्जबाजारीपणापासून दिसून येते. भारतीय राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेवर भर दिला होता. ते एक घोर देशभक्त-महानायक राष्ट्रवादी होते, हे यावरून दिसून येते.

सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी लोककल्याणकारी कायद्याचे राज्य असावे. यावर त्यांनी संविधान सभेत केवळ भरच दिला नाही तर त्याबदल घटनेमध्ये असंख्य अशा तरतुदी देखील करून ठेवलेल्या आहेत. ज्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकांना शोषनापासून मुक्त असेल प्रत्येक नागरिकास समानतेवर आधारित मतदान करण्याचा अधिकार असेल. तसेच आपल्या बुद्धीमत्तेच्या शिक्षणाच्या जोरावर सामान्य नागरिक देखील देशाच्या सर्वोच पदापर्यंत पोंहोचु शकेल, याची व्यवस्था केली. समानतेवर आधारित विषमतामुक्त शोषणमुक्त समाजव्यवस्थेची निर्मीती करणे, हा त्याचा मुख्य उद्देश होता. त्यावर आधारित राज्यघटनेची निर्मिती त्यांनी केलेली आहे. त्यामुळे एक स्वास्थ विकसीत भारत देशाच्या निर्मीतीचे स्वप्न त्यांनी बघीतलेले होते.

विषमता, भ्रष्टाचार, जातीवाद, हिंसा यामुळे समृद्ध भारत पोखरत आहे. दलित व उपेक्षीतांना न्याय मिळावा यासाठी कायदे करण्यात यावे. शोषितांच्या अधिकारांचे कायद्याद्वारे रक्षण करण्यात यावे.

**१) राष्ट्रीय एकात्मता व अखंडता :-**

भारतात जैन, बौद्ध, शीख, इस्लाम ख्रिश्चन इत्यादी अनेक धर्म होते. परंतु विश्वातील सर्व धर्मियांना वंदनीय वाटणारा व भारतीय मानसिकता व संविधान यांच्या अनुरूप असा बौद्ध धर्म त्यांनी स्वीकारला कारण त्यांच्या धर्मपरिवर्तनात विवेकाची, भारतीय राष्ट्रीयत्वाची व एकात्मतेची बीजे समावलेली होती. बुद्ध धर्म

सामाजिक क्रांती आणून एकजिनसी समाज निर्माण करेल अशी त्यांचीया धर्माबाबतची धारणा होती. दारिद्र्य, विषमता, अज्ञान व सर्व प्रकारची कुचंबना शोषन हिच खऱ्या दु:खाची कारणे आहेत. बुद्ध धर्म शिक्षण, शील, चारित्र्य, व्यक्ती स्वातंत्र्य समता व लोकशाहीचे व्यासपिठ आहे.

स्त्री-पुरूष समानता हि राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे. स्त्री-पुरूषांना शोषणाच्या कचाट्यातून सोडविण्यासाठी जाती प्रथा नष्ट करणे आवश्यक आहे. तोच एकमेव उपाय आहे. बुद्ध जंयतीच्या रोजी दिल्ली येथे केलेल्या भाषणात डॉ.आंबेडकर यांनी असे उदगार काढले कि बुद्धाने आपल्याकडे मार्गदर्शकाची भुमिका घेतली व धर्म या शब्दाचा क्रांतीकारी अर्थ बुद्धाने विचारार्थ मांडला. बुद्ध धर्म म्हणजे नीती व धर्माचे नवनीत आहे. म्हणजे नीती व हिन्दु धर्माचे सामाजिक तत्त्व यात असमानता आहे, तर बुद्ध धर्म समतेसाठी उभा आहे. याचा गर्भीत अर्थ असा होतो कि स्त्री-पुरूष समते शिवाय सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता असंभव आहे.

चारसिंह असलेले अशोक स्तंभ व त्यावर अशोक चक्र असलेला राष्ट्रध्वज स्वीकारण्यात आला. तो अपघात नसून मार्ग एक अस्मरणीय भावना विचारसरणी होती. एवढेच नाहीतर हिंन्दु कोड बील मधील स्त्रीयांसाठी असलेल्या कायद्यात त्या कायद्याची असलेली व्याप्ती विशद करतांना म्हटले आहे कि हा कायदा हिंदु, बौद्ध,जैन व शिख या धर्मियांनाही लागु असेल ते धर्माने हिंदु नसतील पण हा कायदा मात्र त्यांना लागु राहील. हे हि राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गावरील ठोस पाऊल आहे.

डॉ.आंबेडकर यांनी संविधान सभेत केलेल्या भाषणात असे म्हटले होते कि २६ जानेवारी १९५० रोजी आपण एका विसंगतीच्या जीवनात प्रवेश केला आपण आपल्या राजकिय लोकशाहीचे हि स्वरुप दिले गेले पाहीजे. राजकिय लोकशाहीला आधारभुत अशी सामाजीक लोकशाही नसल्यास टिकू शकणार नाही. कारण सामाजीक लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, सहकार्य, धर्मनिरपेक्षता, कृषी विकास यांना जीवनाचे सिद्धांत मानून भावी कल्याणकारी राज्याचे ध्यैय साकार करणारी जीवन पद्धती आहे. कुठल्याही बाह्य बंधनाशिवाय जे राष्ट्र आपला अंतर्गत कारभार व परराष्ट्र संबंध आपल्या मर्जी प्रमाणे करु शकतो तो देश सार्वभौम असतो. ज्या देशातील नागरिक आपल्या देशाचा कारभार आपल्या इच्छेप्रमाणे चालवतात त्या ठिकाणीच गणराज्य व लोकसत्ता राज्य असते तिथेच संपूर्ण जनतेच्या कल्याणासाठी राज्यसत्ता कार्य करित असते. तिथेच लोकशाही नांदत असते. त्याठिकाणी कोणत्याही एका धर्माचे, पंधाचे वा समाज समुहाचे राज्य नसते तिघे केवळ धर्मनिरपेक्ष राजवट असते तिथे सर्व स्त्री-पुरूष नागरिक असतात. थोड्याफार कमी प्रमाणात आर्थिक सामाजिक विषमता असते जिथे कोणालाही आर्थिक व मानसिक गुलाम करण्याची संधी नसते. उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीचे असतात त्या ठिकाणी समाजवादी समाज अस्तीत्वात असतो.

पाण्याचे राष्ट्रीय स्तरावरील नियोजन व्यवस्थापन, वितरण करण्यासाठी बहुउद्देशीय प्रकल्प हाती घेऊन आंतरराज्यीय नद्यांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी खोरे निहाय प्राधीकरण स्थापन करण्याचा संबंधीच्या हालचाली सुरू केल्या त्यासाठी राष्ट्रीय स्तरावर एक सर्वोच्च संघटन असावे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. (दै.सम्राट २००९ पृ.०४. जलसंपन्न भारताचे स्वप्न त्यांनी पाहीले होते. याबाबत केवळ विचारच त्यांनी केला नव्हता तर प्रत्यक्ष कृती देखील केलेली दिसून येते. यासाठी तलाव, विहिरी, धरणे बांधल्यावर व वृक्ष लागवडी करण्यावर भर दिला आहे. दामोधर खोरे हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

डॉ. आंबेडकरांना भारत देशाच्या सर्वांगीन विकास घडवून आणावयाचा होता. त्याकरिता पूर्वापार चालत आलेल्या साधनाद्वारे स्वयंपूर्ण तेचे धोरण प्रत्यक्षात साकार होणे शक्य नव्हते हे त्यांनी अचुक ओळखले होते.

कृषी व उद्योगाच्या विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या व दळणवळणाच्या साधनाच्या पुरेपुर उपयोग झाल्याशिवाय स्वंयपुर्ण भारत देशाची निर्मीती शक्य नाही. त्यासाठी मुबलक सेवा सुविधांचा विकास झाला पाहीजे, असे त्यांचे म्हणने होते. विज उत्पादन शक्ती मोठ्या प्रमाणावर सिंचन, रस्ते, वाहतूक सुविधा आणि कुशल मनुष्यबळाचा औद्योगीकरणासाठी आवश्यकता असते त्याकरिता त्यांनी तांत्रिक कार्यक्षम प्रशिक्षीत मनुष्य बळावर भर दिला होता. क्रेंद्रीय विज प्राधिकरणाची स्थापना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २४ नोव्हेंबर १९४४ साली केली होती. (थोरात सु ादेव प्र.९५) याच समाजात सर्वांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळु शकतो. त्याशिवाय आचार विचाराचे, उक्तीचे व भक्तीचे, संचाराचे स्वातंत्र्य असते. अशाच समाजात सर्वांना समान स्थान व संधीची समानता मिळते व्यक्तीची प्रतिष्ठा जोपासण्यात येते. त्यामुळे देशाच्या ऐक्याची व एकात्मतेची जोपासना व रक्षण केल्या जाते.

संसदीय लोकशाहीत लोकमताचा आदर करण्यात येतो. शांततामय मार्गाने घटनेत परिवर्तनात्मक तरतुदी केल्या जाऊ शकतात. चर्चेच्या माध्यमातुन प्रश्नांची सोडवणूक करण्यात येते. त्यामध्ये राजकिय पक्षाची महत्त्वाची भुमिका असते. व्यक्तीच्या गुणवत्तेस महत्त्व देण्यात येते. त्यामुळे संसदीय लोकशाहीवर त्यांनी भर दिला. संसदीय लोकशाहीमध्ये अल्पसंख्यांकांना योग्य स्थान दिले गेले पाहीजे. तसेच प्रभावी विरोधी पक्ष असावा. त्यामध्ये राष्ट्रीय हिताला प्राधान्य देण्यात यावे प्रतिनिधींचे उच्च दर्जाचे चारित्र्य असावे. मुलभुत अधिकारांची व्यवस्था त्यांनी आवश्यक मानले होते. भारताच्या संदर्भात डॉ.बाबासाहेबांनी संसदिय लोकशाही ऐवजी अध्यक्षीय लोकशाही पुरस्कार केला होता.

देशातील सामान्य शेतकरी वर्ग हा संपन्न व्हावा यासाठी त्यांनी त्या दृष्टीने कार्य केलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कुळ कायदे किंवा शेत जमिनीचे एकत्रीकरण यासारख्या उपायाद्वारे भुमिहीन श्रमीकांना आणि दलितांना काही लाभ होणार नाहीत याचे भान होते. त्यामुळे शेतीला शासकिय व्यवसाय करण्याकडे त्यांनी लक्ष दिले. याचाच अर्थ डॉ.आंबेडकरांनी सामुदायिक शेतीचा पुरस्कार केला. त्यांच्या मते लोकशाही तत्त्वावर आधारित सामुदायिक शेती हा अशी पद्धत आहे. जिल्ह्यामध्ये उत्पादकता व कार्यक्षमता कायम राहुन ग्रामीण अर्थव्यवस्थेचे परिवर्तन करणे शक्य आहे. सामाजीक शोषण आणि अत्याचार यांना धारण देण्याची हि पद्धत आहे. यामुळे त्यांनी State and Minorities या ग्रंथामध्ये असे म्हटलेले आहे. कि शेती हा राज्य उद्योग असावा, जमिनीची मालकी राज्याचीच असावी, कोनीही जमीनदार नसावा तसेच कोनीही कुळ किंवा भुमिहीन शेतमजुरही नसावा जातीपातीचा विचार न करता निरपेक्ष बुद्धीने जमिन ग्रामस्थांना कसण्यासाठी द्यावी. हि शेती सरकारच्या नियमानुसार परंतु सामुदायिक पद्धतीने कसली जावी. भारतीय पारंपारीक शेती बदल ते म्हणतात भारतीय शेती हि आजारी पडली आहे. शेतीसाठी शासनाने पुढाकार घ्यायला हवा शेतकऱ्याने शेतीवरचा बोजा कमी करण्यासाठी आपल्या मुलांवर शिक्षण देऊन उद्योगधंदा सुरू करायला हवा आणि सर्वांत महत्तवाच शेतीला आपण उद्योगाचा दर्जा दिला पाहीजे. यातुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतीच्या राष्ट्रीयीकरणावर भर दिल्याचे दिसुन येते.

**निष्कर्ष :-**

१) स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, सामाजीक न्यायावर आधारित भारत देशाची निर्मीती व्हावी यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. ज्ञानाधिष्ठीत समाज निर्मीतीवर त्यांनी भर दिलेला दिसून येतो.

२) शेतकरी-कष्टकरी दलीत वर्गाच्या कल्याणाशिवाय नवीन भारताची निर्मीती करणे शक्य नाही त्यासाठी शेतीचे राष्ट्रीयीकरणावर, सामुदायिक कृषी क्षेत्रावर त्यांनी भर दिलेला दिसुन येतो.

३) स्त्रीयांच्या सन्माना शिवाय राष्ट्रनिर्माणाचे कार्य शक्य होणार नाही त्यांना मतदानाचा अधिकार, त्यांचे मानसिक शारिरीक शोषण विषमता, कुटूंब नियोजनाचे ज्वलंत आहेत. हे त्यांच्या विचारातून दिसून येते.

४) जातीयता समाप्त करून सामाजिक समता, दलित वंचीत शोषितांच्या अधिकारांचे रक्षण केल्या जावे.

५) डॉ.आंबेडकर हे दलित, शोषीत व वंचिताचे हितरक्षण कर्ते नव्हते आधुनिक भारताच्या निर्मीतीचे ते शिल्पकार होते. नव संस्कृतीचे जनक होते.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**

१) सोनटक्के अरविंद डॉ.महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साधना पब्लिकेशन परभणी, २०१२ प्र.आ.

२) हनवते उत्तम डॉ. अर्थतज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अरुणा प्रकाशन लातुर २०१३ प्र.आ.

३) भोसले नारायण - महाराष्ट्रातील स्त्री विषयक सुधारणा वादाचे सत्तांतरण (१८४८-१९५६) पुणे, २००८ प्र. २९३-२९४

४) गायकवाड प्रदिप (संपा) समता, समता समाज संघाचे मासिक मुखपत्र, नागपूर २००६ प्र.१४९

५) किर धनजय -डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९७६ प्र. ४०४.